# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२/०००७.
तार - EDUTECH E-mail : desk4a@dte.org.in Internet :http//www.dte.org.in


अतितात्काळ
कालमर्यादीत दि १८.०१.२०१२

क्रमांक : ४अ/आस्था/२०१२/शा २५८११
दिनांक : 16 जनवरी JAN 2012

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

विषय : शासन आदेशान्वये नामनिर्देशनाने नियुक्ती झाल्यानंतर एकत्रित रुजू अहवाल सादर करण्याबाबत.
संदर्भ : शासन पत्र क्रमांक एसीसीटी-२०११/(७०/११)/तांशि-७, दिनांक १८.११.२०११

महोदय,

उपरोक्त संदर्भाचे शासन पत्र कृपया पहावे.

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतनामध्ये सरळसेवेने उपरोक्त आदेशान्वये आयोग पुरस्कृत उमेदवारांना पदस्थापनेचे आदेश अटी व शर्तीच्या अधीन राहून निर्गमीत केले आहेत. सदर आदेशातील अट क्रमांक ९ अन्वये पदस्थापना दिलेल्या उमेदवारांनी नियुक्ती आदेश निर्गमीत झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत रुजू होणे आवश्यक आहे विहित मुदतीत जर संबंधित उमेदवारांनी नियुक्ती स्विकारली नाही शिवाय प्रस्तुत नियूक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही तर त्यांचे नाव, कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील असे नमुद केले आहे. शासन आदेशातील अट क्र ९ अन्वये विहित मुदतीत रुजू झालेले नाहीत अशा उमेदवारांच्या सेवा संपुष्टात आणण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करावयाचा आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, खाली नमुद केलेल्या तक्त्यामध्ये आपल्या अधिपत्याखालील संस्थेतील शाखानिहाय माहिती DV TTNatraj या फॉन्टमध्ये तयार करुन तात्काळ मेल करावी व मेल केल्यानंतर संचालनालयास मेल प्राप्त झाला किंवा नाही याबाबत खात्री करुन घ्यावी म्हणजे शासनास माहिती लवकरात लवकर उपलब्ध करुन देणे या संचालनालयास शक्य होईल.

आपला,

( के. पी. नारखेडे )
प्र. उपसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०१२/ ३६८
दिनांक :- 18 JAN 2012

प्रति,
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जितूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपल्या संस्थेतील शाखानिहाय माहिती DV TTNatraj या फॉन्टमध्ये तयार करुन **तात्काळ** या कार्यालयास मेल करावा व मेल केल्यानंतर या कार्यालयास प्राप्त झाला किंवा नाही याबाबत खात्री करुन घ्यावी.

सोबत :- तक्ता व शासन पत्र जोडले आहे.

**( महेश शिवणकर )**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

# प्रपत्र अ

| अक्र | नियुक्ती आदेशातील अ क्र | गुणवत्ता क्रमांक | नियुक्ती न स्विकारलेल्या उमेदवाराचे नाव | पदस्थापनेचे ठिकाण | नियुक्ती आदेश क्रमोक |
|---|---|---|---|---|---|
| २. | | | | | |

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: एससीटी-२०११/(७०/११)/तांशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय
मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १८/११/२०११

प्रति,

प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई- ४०० ००१

विषय:- सरळ सेवा प्रवेश
महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ मधील अधिव्याख्याता, परीक्षा नियंत्रक, विभाग प्रमुख इत्यादी पदांवर रुजू न झालेल्या उमेदवारांबाबतचा अहवाल-

महोदय,

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ मधील विविध शाखेतील अधिव्याख्याता व विभाग प्रमुख इत्यादी पदांकरीता शिफारस केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश मागील १ वर्षात निर्गमित करण्यात आले आहेत.सदर नियुक्ती आदेशानुसार अद्याप किती उमेदवार नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झालेले नाहीत, त्याबाबतचा शाखानिहाय अहवाल शासनास सात दिवसात सादर करावा. हि विनंती.

आपला

(वि. भा. सोनवणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

पत्र प्राप्त झाले
19

तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
२११-२५८११
दिनांक २११११२०११
कार्यासन क्र. ७अ

D:\Documents and Settings\Administrator\Desktop\Sorte\RTI.doc